आम्ही
# पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३१ वे अंक नववा पृष्ठे १४ सप्टेंबर २०२२ www.parlekar.com Registered-RNI no. 54781/92

या अंकात

पान ०७ पार्लेकरांसाठी एक महत्त्वाचे संमेलन स्थळ बनून राहिलेला हा मार्ग ओळखा बरे!!
पान ०९ रंगुनी रागांत साऱ्या
पान १० थोर शास्त्रज्ञांची ओळख लेखमाला भाग १ जॉन डाल्टन
पान ११ सांस्कृतिक दरोडेखोरी



पान ५
आदरणीय पं.मनोहर जोशी सर
एक आनंदयात्री !

# पार्ल्यात गणेशोत्सव दिमाखात साजरा

कोविडच्या सावटाखाली गेली दोन वर्षे घालवल्यानंतर ह्या वर्षी समस्त पार्लेकरांनी सार्वजनिक श्री गणेशोत्सव मोठ्या दिमाखात साजरा केला.

भव्य मूर्ती, देखणी व प्रसंगी भव्य आरास, आकर्षक व समर्पक देखावे, मंडळांनी व मूर्तिकारांनी घेतलेली पर्यावरणाची काळजी या गोष्टी यंदा प्रकर्षाने जाणवल्या.

'श्री' हे मूळतःच तब्बल ६४ कलांचे देव. त्यामुळे प्रत्यक्ष त्यांना साकारणं हे प्रत्येक कलाकाराला आव्हान आणि आनंदाचा प्रत्यय एकाच वेळी देते. 'श्री' हे मूर्तीमंत सौंदर्य, दिमाख व तेज ह्यांचे प्रतीक. समस्त देवाधिकांमध्ये यांचा रुबाब काही वेगळाच. सुबक, सर्वांगसुंदर मूर्तींवरील साजशृंगार, आकर्षक प्रकाश योजना, स्टेजवरील सुंदर देखावे आणि त्याला सुमधुर संगीताची जोड म्हणजे 'सोने पे सुहागा', आणि हो, ह्या सर्वांच्या जोडीला भाविकांची गर्दी ही हवीच.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधत काही गणेश मंडळांनी समर्पक आरास केली आहे. उदा. सुभाष रोड सा.ग.उ.मं. श्रद्धानंद रोडच्या कुणबी समाज सा.ग.उ. मंडळाने राष्ट्रध्वजाच्या जन्मापासून आत्तापर्यंतचा प्रवास व त्यात घडत गेलेले परिवर्तन छान चित्रीत केले आहे.

काही मंडळांनी अपेक्षेप्रमाणे



कोविड योध्यांना मानवंदना दिली आहे. उदा. मुंबईचा पेशवा (वर्ष ३४वे). श्रद्धानंद रोडच्या नवयुग क्रीडा मंडळाने सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त पन्नास वर्षांपूर्वीच्या चाळीची भव्य प्रतिकृती उभारत मंडळाचे संस्थापक सदस्य म्हणजे चाळीचे त्या वेळचे रहिवासी यांची प्रत्यक्ष नावे घराच्या दरवाजांवर लावली आहेत. हे बघता बघता मी नकळत पार्ल्याच्या व माझ्या भूतकाळात कधी शिरलो माझे मलाच समजलं नाही.

**बोला तर मग**
**गणपती बाप्पा मोरया ! आणि**
**हो उंदीर मामा की जय !**



## संपादकीय

मुंबई महानगर पालिकेच्या निवडणूका ह्यावर्षी मार्च मध्ये होणार होत्या पण अनेक कारणांनी त्या पुढे ढकलण्यात आल्या. आता पावसाळ्यानंतर त्या होतील अशी अपेक्षा आहे.

आपले पार्ले विद्येचे माहेर आहे, मुंबईतीलच नव्हे तर महाराष्ट्रातील महत्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे. बहुतेक मराठी कुटुंबांचे पार्ल्यात घर घेण्याचे, राहण्याचे स्वप्न असते. हे सर्व जरी खरे असले तरी पार्ल्यात सर्व आलबेल आहे, कुठलेच प्रश्न नाहीयेत असे बिलकुल नाही. रहदारी, पार्किंग, कचरा नियोजन, अनधिकृत फेरीवाले, असे अनेक प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. पुनर्विकासाच्या प्रक्रियेमुळे पालिकेच्या सेवांवर अधिकच ताण पडणार आहे. पार्लेकरांची पाण्याची, रस्त्यांची, पार्किंगची गरज वाढतच जाणार आहे. कश्या पुरवणार ह्या गरजा? आमच्या लोक प्रतिनिधींनी, प्रशासनाने ह्यावर काही विचार केला आहे का ?

पार्ल्यातील सर्वात मोठा प्रश्न आहे फनेल झोन बाधितांचा. फनेल झोनमुळे पार्ल्यातील अनेक इमारतींचा पुनर्विकास रखडला आहे. गेली अनेक वर्षे हे लोकं लोकप्रतिनिधींकडे, सरकारकडे, प्रशासनाकडे खेटे घालत आहेत पण अजूनही ह्या प्रश्नाचे घोंगडे भिजतच पडले आहे. कोणी म्हणते क्लस्टर डेव्हलपमेंट हा मार्ग आहे, कोणी म्हणते स्वयंविकास हा मार्ग आहे पण वास्तव हे आहे कि ह्यातील अनेक इमारतींची अवस्था आज बिकट आहे. काही अपघात झाला, (होऊ नये पण) दुर्दैवाने एखादी इमारत कोसळली तर त्याची जबाबदारी कोणाची असणार आहे ? पार्ल्याच्या लोकप्रतिनिधींनी, राजकीय नेत्यांनी ह्या विषयावर अनेक सभा घेतल्या, हा प्रश्न सोडवण्याची अनेक आश्वासने दिली पण परिस्थिती ‘जैसे थे’ अशीच आहे.

पालिका निवडणूक जवळ येत आहे. सर्वपक्षीय उमेदवार मतांचा जोगवा मागायला मतदारराजाच्या दरवाज्यात येणार आहेत. आमचे सर्व उमेदवारांना कळकळीचे आवाहन आहे की मत मागण्याबरोबरच पार्ल्याचे प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत आपल्याकडे काय योजना आहे ह्याची सविस्तर माहितीसुद्धा आपण मतदाराला द्यावी. आमच्या मतांच्या बदल्यात आपल्याकडून आश्वासनांची नव्हे तर कामाची व रिझल्टसची अपेक्षा आहे !

आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे – अेस ग्राफिक्स

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# विलेपार्ले गणेश दर्शन

सर्व फोटो व लेख -
डॉ. अविनाश ठाकूरदेसाई
९८२०२ ८२१०१




लोकमान्य सेवा संघ, टिळक मंदीर (१००वर्षे)



विलेपार्ल्याचा गौरव, बाळ मित्र मंडळ, सर पी.एम. रोड



नवयुग मित्र मंडळ, अ. वा. वर्तक रोड (२५ वर्षे)



मारुती मंदिरातील सार्वजनिक गणपती, कंकूवाडी



जांभूळकाकाची वाडी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (४६ वर्षे)



मुंबईचा पेशवा



बोरी चाळ रहिवासी संघ, सर पी. एम. रोड विस्तारीत (११ वर्षे)



विलेपार्ले कुणबी समाज सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ



# विलेपार्ले गणेश दर्शन



ओम साई सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ,
(२००४ पासून)



विलेपार्ले लोकसेवा मंडळ,
हनुमान रोड (५२ वर्ष)



एकदंत मित्रमंडळ, श्रध्दानंद रोड,
पेपरची मूर्ती (१५ वर्ष)



बाल मित्र मंडळ, राम मंदिराचा राजा
(४७ वर्ष)



श्री शिवाजी मराठा मंडळ,
मारूती मंदीर ट्रस्ट, कुंकुवाडी (९३ वर्ष)



विलेपार्ल्याचा राजा (१९७० पासून)



पार्लेश्वर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ,
(२६ वर्ष)



विलेपार्ल्याचा विघ्नहर्ता (४६ वर्ष)

# विलेपार्ले गणेश दर्शन



विलेपार्ले सम्राट (५७ वर्ष)



विलेपार्ले सम्राट, नवयुग क्रीडा मंडळ, श्रध्दानंद रोड (५० वर्ष)



विलेपार्ल्याचा विघ्नेश, समर्थवाडी, संत जनाबाई रोड (२५ वर्ष)




विलेपार्ल्याचा गणराज (२५ वर्ष)



विलेपार्ल्याचा वक्रतुंड, जय गणेश मित्र मंडळ



विलेपार्ल्याचा विश्वविनायक, बालगोपाळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ



सुभाष रोड सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळ, सुभाष रोड नाका

## आदरणीय पंडित मनोहर जोशी सर

# एक आनंदयात्री !

गुरुकुल


गाण्याच्या प्रवासातील अनेक सह प्रवाश्यांकडून पंडित जोशी सरांबद्दल बरंच काही ऐकलं होतं. त्यामुळे भेटायची खूप इच्छा होती. सर १४ सप्टेंबरला शंभरीत प्रवेश करीत आहेत. त्या निमित्ताने या निरालस माणसाचा चरणस्पर्श आणि मुलाखत या दुहेरी हेतूने भेट घेतली. सरांचा जन्म १४ सप्टेंबर १९२३ रोजी रायगड जिल्ह्यातील महाड जवळील गोरेगाव इथे झाला. सातवीपर्यंत शिक्षण गोरेगावात. पुढे शाळा नव्हती आणि भिक्षुकीचं घराणं. त्यामुळे व्यवसायाच्या दृष्टीने थोरल्या बंधुंनी सांगलीच्या वेदपाठ शाळेत पाठवलं. पण संगीताची मनापासून आवड होती. त्यामुळे मन तेथे रमलं



नाही. मित्रासह पंढरपूर येथे जगन्नाथबुवा पंढरपूरकरांकडे जाऊन पोचले. तिथे राहायची सोय आणि शिक्षण मोफत आहे. मित्र तबल्या कडे वळला. सर हार्मोनियम कडे. राहाणं मोफत होतं तरी पोटापाण्याची सोय स्वत: करायची होती. त्यामुळे माधुकरी मागून शिक्षण पूर्ण केलं. ग्वाल्हेर घराण्याची अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची अलंकार ही पदवी प्राप्त केली. शिक्षण पूर्ण केलं म्हणण्यापेक्षा गाणं जितकं शक्य तितकं आत्मसात केलं असं म्हणणं संयुक्तिक ठरेल. पंढरपूरहून शिक्षण पूर्ण झाल्यावर ४२ साली मुंबई गाठली. पण सर्वप्रथम गाणं नव्हे तर व्हायोलीन शिकवायला सुरुवात केली. सूर पक्का असल्यामुळे व्हायोलीन, सतार, मेंडोलीन, तबला वगैरे बहुतेक सगळी वाद्यं सर उत्तम वाजवू शकतात आणि शिकवू शकतात. पण महत्वाचं गाणं. मुंबईत आल्यावर सरांचं संगीताचं ज्ञान पाहून व्यास संगीतालयाच्या शंकरराव व्यासांनी नोकरी आणि आपली मुलगीही दिली. दहा वर्षं संगीत शिक्षक म्हणून काम केलं. सर विद्यार्थ्यांमध्ये प्रिय त्यामुळे वर्ग कायम भरलेले. पुढे बालमोहन शाळेत संधी मिळाली. त्यानंतर जोगळेकर संगीत विद्यालयात. पत्नी सौ. मालतीबाई गाणाऱ्या असल्याने जोडीने संगीताचा संसारही सुरु राहिला. जोगळेकर संगीत विद्यालयात दोघेही शिकवत असत. सर पंच्याहत्तराव्या वर्षापर्यंत शिकवत होते. त्यानंतर वीस वर्षे पार्ल्यात व्यासांकडे. आता घरीच शिकवतात. कोविड मुळे दोन वर्षं क्लास बंद होता. आता हळुहळु पुन्हा सुरुवात होत आहे.

आॅल इंडिया रेडिओवर सरांचा पेटी वादनाचा सोलो कार्यक्रम झाला. तो ऐकून त्यांना साथीसाठी बोलावणं येऊ लागलं. १९७२ ते ८७ पंधरा वर्षं आॅल इंडिया रेडिओवर नारायण राव व्यास, विनायक बुवा पटवर्धन, रामकृष्ण बुवा पटवर्धन, राजा काळे अश्या दिग्गजांना हार्मोनियमची साथ केली आहे. शंकरराव व्यासांच्या तीन चित्रपटांच्या गाण्यांसाठी साथ केली आहे. भालजी बाबांची ही खूप गाणी केली आहेत. बालमोहनच्या रियुनियन निमित्ताने कार्यक्रम झाला तेव्हा पद्मजा फेणाणी वगैरे विद्यार्थी मंडळी प्रॅक्टिसला घरी आली होती. शाळेच्या समारंभात सरांचा सत्कार केला. त्यांच्या आयुष्यातील काही अविस्मरणीय क्षणांपैकी एक हा क्षण. बालमोहन शाळेच्या काळात रोजची प्रार्थना आॅर्गनवर म्हणणे हा मान रिटायर होईपर्यंत सरांचा होता.

सर स्वत: गात नाहीत. आपण गाऊ शकत नाही, पण उत्तमोत्तम विद्यार्थी तयार करायचे हे ध्येय ठेवलं. एरवी कितीहीमृदु स्वभावी असले तरी गाण्याच्या बाबतीत कडक आहेत. विद्यार्थी आला की पहिली दहा मिनिटं आकाराचा रियाझ. मग पुढचं गाणं. आज सुप्रसिद्ध गायक असलेला त्यांचा एक शिष्य आठवण सांगतो, की एकदा काही कारणाने सूर लागत नव्हता तर सरांनी त्याला सरळ घरी पाठवून दिला. नीट रियाझ करून ये म्हणून. जितके कडक तितकेच विद्यार्थ्यांत प्रिय आहेत. बोलतानाही त्यांच्यातील



हाडाचा शिक्षक गाण्याबाबतीत बारीक सारीक टीपा देत होता. आत्ताही पाच सहा विद्यार्थी इतके तयार आहेत की उत्तम मैफिल करू शकतील. असंही ते कौतुकाने सांगतात. आतापर्यंत जवळपास ऐंशी विद्यार्थी सरांकडून संगीत विशारद झाले आहेत. कित्येकांनी स्वत:चे क्लास सुरु केले आहेत. त्यांचे गायक शिष्य जगभर पसरले आहेत. नीलाक्षी जुवेकर, शरद जांभेकर, आनंद सावंत, अर्चना गोरे, योगिता चितळे, दीपाली कामत अशी गाण्याच्या क्षेत्रात चमकणारी कितीतरी सुप्रसिद्ध मंडळी सरांचे शिष्य आहेत.

मी मुलाखत घ्यायला गेले तेव्हा मेंडोलीन शिकणारे विद्यार्थी, पार्ल्यातील सुप्रसिद्ध

पान ६ वर



पान ५ वरून

## एक आनंदयात्री !

डॉ. अविनाश ठाकुरदेसाई यांच्यासाठी चीजेची नोटेशन्स काढणं चालू होतं. अप्रतिम सुंदर



अक्षर. अजुनही तल्लख मेंदू आणि भरपूर उत्साह. सगळी नावं, घटनांची वर्षं खणखणीत आठवतात. उच्चार स्पष्ट आहेत. विनोद बुद्धी शाबूत आहे. सांगलीला असताना कृष्णा काठी आंघोळीला गेले असताना या गोऱ्या देखण्या चुणचुणीत तरुणाला प्रोड्युसरने हिरोचं काम करशील का असं विचारलं होतं. मी नाही म्हटलं. नाहीतर आज हीरो म्हणून चमकलो असतो, हे ही ते खुदुखुदु हसत सांगतात. सरांच्या पोतडीत भरपूर किस्से आहेत. जगन्नाथ बुवांच्या बरोबर दौऱ्यावर गेले असताना सर तानपुरा लावत होते. बाजूला गाणं कळतं अश्या आविर्भावात माणूस बसला होता. त्याला काळी दोन चा सूर द्या हो म्हटलं तर त्याने बुचकळ्यात पडून विचारलं, कुठल्या बाजूने देऊ? परीक्षा घेताना छोट्या मुलाला विचारलं आता रागाचे वादी संवादी सूर सांग, तो निरागसपणे म्हणाला, वहीत आहेत. पंढरपूरला माधुकरी मागावी लागायची. सगळेच विद्यार्थी मागत. पण सरांना



जवळपास रोज पुरणपोळी मिळायची. बरोबरीच्या मित्रांना साधं जेवण. त्यामुळे ते सगळे चिडत असत. जगन्नाथबुवा अतिशय तापट होते. त्यांच्या जवळ बसणाऱ्यांना रागाचा तडाखा सहन करावा लागे. सर हार्मोनियम वर असल्याने नेहमी वाचत. हे सांगताना त्या आठवणींनी त्यांना हसू आवरत नव्हतं. अत्यंत निर्व्याज हसू.

आयुष्यातही कधी पैशाचा हव्यास केला नाही. उलट सर्वांना जेवढी मदत करता येईल तेवढी केली. आतापर्यंतचं आयुष्य अतिशय संपन्नतेने जगले आहेत आणि मुलं, नातवंडां - पतवंडांसमवेत आनंदाने कालक्रमणा करीत आहेत. सरांना वाढदिवस आणि उत्तम आयुरारोग्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!!

अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२

## कॉम्रेड मॅरेथॉन मध्ये पार्लेकर सुजीत गोरे यांचे यश

२८ ऑगस्ट २०२२ रोजी दक्षिण आफ्रिका येथे जगातील सर्वात जुनी, लांब,अवघड आणि शरीर व मानसिक बलाची परीक्षा घेणारी कॉम्रेड मॅरेथॉन झाली . त्यामधे ९० कि मी अंतर जास्तीत जास्त १२ तासात पूर्ण करणे अपेक्षित असते. विलेपार्ले येथील रहिवासी श्री सुजीत गोरे ( वय ५९) यांनी ही दौड अकरा तास अडतीस मिनिटात यशस्वीरीत्या पूर्ण केली.

सुजीत गेली पाच वर्षे 'टॉप गियर' या संस्थेमध्ये मॅरेथॉन चे प्रशिक्षण घेत आहेत. आतापर्यन्त २५ अर्ध, १५ पूर्ण आणि तीन वेळेस अवघड अशी ५५ किमी ची टाटा अल्ट्रा दौड त्यांनी पूर्ण केली आहे. पार्ले टिळक शाळेत असताना क्रिकेट त्यानंतर बॅडमिंटन या खेळात त्यांनी प्रावीण्य मिळवले होते.

९० की मी अंतर वेळेत पार करणे हे स्वप्न उराशी बाळगून सुजीत गेले वर्षभर रात्रंदिवस मेहनत घेत होते. वेळापत्रकानुसार भल्या पहाटे ४:३० ला ऊठून त्यांचा दिवस सुरु होत असे. यासाठीचे मार्गदर्शन 'टॉप गियर' चे सॅमसंग सर यांनी केले. पूर्वी ह्या मॅरेथॉन मधे भाग घेतलेल्या टॉप गियर मधील मित्रांनी, विशेषत: माधव जोशी यांनी वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन करुन प्रोत्साहन दिले.

सर्वांनी प्रयत्न करुन आपली शारीरिक क्षमता वाढवावी आणि त्यासाठी आवश्यक तो व्यायाम सातत्याने करावा असे त्यांना वाटते. जिद्द, मेहेनत, योग्य आहार, तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन आणि समविचारी मित्रांची साथ हे माझ्या यशाचे रहस्य आहे असे ते म्हणतात.






# पार्लेकरांसाठी एक महत्त्वाचे संमेलन स्थळ बनून राहिलेला हा मार्ग ओळखा बरे!!

आज आपण पार्ल्यातील सर्वात जास्त पदपात (footfall) असलेल्या मार्गाची ओळख करून घेणार आहोत. या मार्गाची ओळख करून देणे म्हणजे मुंबई आग्रा महामार्गाची ओळख करून देणे किंवा पेशावर आणि कलकत्ता या दोन नगरांना जोडणाऱ्या ग्रँड ट्रंक महामार्गाची ओळख करून देण्यासारखे आहे!

या मार्गावर कदाचित पार्ल्यामधील सर्वात जास्त व्यावसायिक आर्थिक व्यवहार होत असावेत. हा मार्ग म्हणजे पार्लेकरांची जीवनवाहिनी आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होऊ नये.

या मार्गावर मंदिरे, विद्यालये, चित्रपट गृहे, विविध प्रकारच्या वस्तू विक्रीची दुकाने, उद्याने, क्षुधा शांतीगृहे, खाद्यपदार्थांचे छोटे मोठे स्टॉल, गाड्या, भाजी विक्रेते आणि अगदी एक इस्पितळ सुद्धा आहे!

जीवनाला लागणारी प्रत्येक वस्तू पार्ल्यात जर का कुठल्या मार्गावर मिळत असेल तर ती या मार्गावर!

होय. तुम्हाला या मार्गाचे नाव कुठले असावे बरे? असा विचार करण्याची जराही आवश्यकता पडली नसेल याची आम्हाला खात्री आहे! हा मार्ग म्हणजे आपला एम. जी. रोड!

विलेपार्ले रेल्वे स्टेशन कडून नेहरू मार्गावर आले की डाव्या बाजूला पहिला राम मंदिर मार्ग सुरू होतो त्यापुढे लगेचच छोटे वाहतूक बेट आहे. या चौकाचे भोगले चौक असे नाव आहे. येथूनच डाव्या बाजूला एम जी रोड सुरू होतो असा बऱ्याच जणांचा समज आहे. परंतु तसे नाही. हा जो मार्ग आहे त्याला श्रद्धानंद मार्ग असेच नाव आहे. श्रद्धानंद मार्ग राम मंदिर मार्गापर्यंत येतो. याच चौकामध्ये उजव्या बाजूला राम मंदिर आहे.




तेथून पुढील मार्गाला एमजी रोड हे नामाभिधान आहे आणि तो पुढे थेट शान टॉकीज पर्यंत जातो. जराही वळण नसलेला असा हा सरळसोट मार्ग हा पार्ल्याची शान आहे. दिल्लीचा चांदणी चौक, पुण्याचा लक्ष्मी रोड, कलकत्त्याचा चौरिंघी रोड, चेन्नईचा अण्णा सलाई मार्ग तसाच हा पार्ल्याचा मानदंड असलेला एमजी रोड!

भोगले चौकातून श्रद्धानंद मार्ग आणि एमजी रोडच्या मीलनाजवळ डाव्या बाजूला पार्ल्याच्या दुकान इतिहासाचा श्रीमंत वारसा सांगणारे साठ्यांचे सुप्रसिद्ध विजय स्टोअर्स आहे. हे स्टोअर्स कै. सिताराम पुरुषोत्तम उपाख्य




भाऊसाहेब साठे यांनी १९३३ मध्ये सुरू केले. मूळचे कोकणातील रत्नागिरी जनपदातील, सुसेरी गावचे भाऊसाहेब साठे आपल्या महत्त्वाकांक्षांना यशामध्ये रूपांतारित करण्यासाठी नोकरी सोडून १८ वर्षांचे असतानाच पार्ल्याला आपल्या मामांकडे आले. पार्ले टिळक विद्यालयामध्ये शिक्षकाची नोकरी, नंतर काही कारखान्यांमध्ये तंत्रज्ञाची नोकरी, नंतर शिलाईच्या दुकानापासून छापखान्यापर्यंत त्यांनी अनेक नोकऱ्या केल्या. परंतु भाऊसाहेबांचा पीळ हा व्यवसायाचा होता. त्यामुळे त्यांनी छोटे-मोठे अनेक व्यवसाय करून शेवटी विजय स्टोअर्स सुरू केले. पार्ल्यामधील अनेक कुटुंबांचा विजय स्टोअरशी पिढ्यान् पिढ्यांचा संबंध आहे.

आपण राम मंदिर मार्गावरील राम मंदिराबद्दल राम मंदिर मार्गावरील लेखाच्या वेळी माहिती घेतली आहे.

वस्तूत: या राम मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार हे एमजी रोडवरच आहे. विलेपार्ल्यामधील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव लोकमान्य टिळकांचे निधन ज्या वर्षी झाले त्या वर्षी म्हणजे १९२०मध्ये या राम मंदिरामध्येच साजरा करण्यात आला.

या मंदिराकडेला पार्लेकरांमध्ये गेली कित्येक वर्षे प्रसिद्ध असलेले अस्सल मराठमोळे, प्रभुकृपा हे दुकान आहे.

विजय स्टोअरला लागूनच लगेच भोगले कुटुंबीयांचे प्रसिद्ध जवाहर बुक डेपो हे पार्ल्यातील पहिले पुस्तक दुकान आहे.

त्यानंतर एक दोन इमारती सोडून डाव्या बाजूला मंडईचा रस्ता आहे, जो सरळ रेल्वे स्टेशनच्या पादचारी पुलापर्यंत जातो. या मंडईची भुरळ पार्ल्याच्याबाहेरील बऱ्याच मुंबईकरांना आहे. पार्ल्यामधील मंडईमध्ये भाजी उच्च गुणवत्तेचीच मिळणार अशी बऱ्याच जणांची खात्री आहे. त्यामुळे कित्येक लोक रिक्षा, टॅक्सी किंवा स्वत:च्या वाहनाने पार्ल्याबाहेरून आजही या मंडईमध्ये येऊन भाजी घेऊन जातात.

या मार्गाच्या अगदी समोर, उजव्या बाजूला गावडे




रुग्णालय आहे. लगेच पुढे डाव्या हाताला पार्ल्यातील प्रसिद्ध सुंदर हॉटेल आणि थोडे पुढे गेले की उजव्या हाताला महानगरपालिकेचे आनंदीबाई केसकर उद्यान आहे.

येथेच महानगरपालिकेतर्फे १९३० मध्ये प्राथमिक मराठी शाळा सुरू करण्यात आली होती. आज तेथे मुंबई पब्लिक स्कूल आहे.

त्याच्यासमोर डाव्या हाताला शर्मांचे प्रसिद्ध भेळपुरीचे दुकान आहे. येथील भेळ पुरी खाल्ली नाही तर तुम्ही पार्लेकर नाही असा एक अलिखित नियम आहे.

त्यानंतर डाव्या बाजूला विष्णू स्टोअर आणि व्यंकटेश्वरा हॉटेल आहेत. या दोन्ही संस्था पार्ल्यातील अत्यंत जुन्या संस्थांपैकी आहेत. या दुकानांच्या लगत, मागे, विलेपार्ल्याचे निर्माते असे म्हटले तर वावगे ठरू नये त्या बाबुराव परांजपे कुटुंबीयांचेनिवासस्थान आहे. परांजपे यांचा चांदीचा कारखाना याच जागेमध्ये एकेकाळी होता.

पुढे डाव्या बाजूला विष्णुप्रसाद ही पार्ल्यातील जुनी सोसायटीही आहे. पार्ल्यातील प्रसिद्ध प्राध्यापक प्रोफेसर चांदेकर हे याच सोसायटीत राहायचे. सध्या त्यांचे सुपुत्र ज्ञानेश चांदेकर जे 'आम्ही पार्लेकर'चे संपादक आहेत, ते याच सोसायटीमध्ये राहतात.


पुढे उजव्या बाजूला विलेपार्ल्याचे नाव धारण करणारे पार्लेश्वराचे मंदिर आहे. विलेपार्ल्याचे



जमीनदार श्री वाडिया यांनी पार्ल्याची वस्ती वाढू लागली, तेव्हा हिंदू देवालय बांधण्यासाठी जागा दान म्हणून दिली होती. या जागेमध्ये विहीर खोदत असताना एक शिवबाण सापडला.

या जागेतच परांजपे यांनी शिवमंदिर बांधायचे

पान ८ वर



पान ७ वरून

## पार्लेकरांसाठी एक महत्त्वाचे संमेलन स्थळ बनून राहिलेला हा मार्ग ओळखा बरे!!

ठरवले.

सुरुवातीला छोटेसे पत्र्याचे मंदिर बांधले गेले आणि १९१२ मध्ये तेथे महादेवाची प्राणप्रतिष्ठा झाली. या मंदिराचा पुढे विकास होत गेला आणि १९३५ मध्ये नवे मंदिर बांधण्यात आले. पार्लेश्वर म्हणून ते पार्लेवासियांचे श्रद्धास्थान म्हणून आजही अभिमानाने उभे आहे.

पार्लेश्वरच्या समोरच मराठी बाणा अभिमानाने मिळवणारे 'मी मराठी' हे प्रामुख्याने मराठी



खाद्यपदार्थांसाठी प्रसिद्ध असलेले मी मराठी हे हॉटेल आहे. पुढे चौकातील वाहतूक नियंत्रक दिवे ओलांडल्यावर लगेच डाव्या बाजूला भव्य असे जैन मंदिर आहे. हे जैन मंदिर रतिलाल



मणिलाल नानावटी यांनी आपली जागा देऊन बांधले आहे. त्याकडेच जैन मुनि आणि भाविकांना तात्पुरते राहण्यासाठी त्यांनी आराधना भवनही बांधले आहे. नानावटी इस्पितळाचे संस्थापक म्हणून या रतिलाल नानावटी साहेबांचे नाव आदराने घेतले जाते.

त्यानंतर जैन मंदिराच्या समोर उजवीकडे पार्ले टिळक विद्यालय संस्थेची आयसीएसई शिक्षणक्रमाची इमारत उभी आहे. येथे काही वर्षांपूर्वी मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा होती. तसेच थोडे पुढे गेले की डाव्या बाजूला स्वातंत्र्यवीर सावरकर सेवा केंद्र ही सामाजिक



कार्य करणारी संस्था आणि त्याला लागून शान चित्रपटगृह. हे चित्रपटगृह श्री बाबुभाई मणिभाई जोशी यांनी १९४२ साली सुरू केले. याच बाबुभाईंनी आपल्या काही मित्रांबरोबर सध्याच्या सन सिटी (लक्ष्मी टॉकीज) च्या जागेवर शान टॉकीज काढण्याचे आधी आनंद टॉकीज नावाचे चित्रपटगृह सुरू केले होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर सेवा केंद्र हे कैलासवासी रामभाऊ बर्वे आणि त्यांच्या काही मित्र आणि सहकाऱ्यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी स्थापन केले होते.

राम मंदिर रोड, मोंघीबाई रोड, चित्तरंजन रोड, महंत रोड, हनुमान रोड , ठाणावालालेन, पार्लेश्वर मार्ग, असे तब्बल दहा ते बारा मार्ग एमजी रोडला छेदतात.

असंख्य कापड व इतर जीवनोपयोगी वस्तूंची दुकाने, दागिन्यांची दुकाने, डॉक्टर एनसी जोशी, डॉक्टर उदयकांत खरे, डॉक्टर परुळेकर यांच्या सारखे अनेक विद्वान डॉक्टर लोक, उद्याने, शिक्षण संस्था, भाजी मंडई, आणि मुख्य म्हणजे जवळच रेल्वे स्टेशन या सर्वांमुळे पार्लेकरांची सतत वर्दळ असणारा, गणपती, दिवाळी आणि इतर सण समारंभामध्ये अधिकच गजबजून जाणारा आणि तेजस्वी दिसणारा एमजी रोड हा सर्वार्थानेपार्लेकरांसाठी एक महत्त्वपूर्ण असे संमेलन स्थळ म्हणून बनून राहिला आहे.

**दादासाहेब दापोलीकर**
९९६७८४०००५

## पार्लेपुराण

सुन्या पार्ल्यात लहानाचा मोठा झाला. मुळात तो जन्मालाच आला पार्ल्यात म्हणजे नक्की सांगायचे तर कारभारी प्रसूती गृहात. पार्ल्यात म्हणजे विद्वत्तेच्या पुण्यात. ही पार्लेश्वरांची पुण्याई म्हणता किंवा पुण्यातल्या दगडू शेट गणपतीची कृपा. लहानाचा मोठा झाला म्हणजे पितळे वाडीतल्या पितळे कडची मसाला भाजी आणि पोळी किंवा तिखट जाळ वडापाव त्याने जितके चवीने मित्रा बरोबर हादडले तितक्याच चवीने त्याच ठिकाणी काळानुरूप बदलून आलेल्या रंगतदार कॅफे कॉफी डे मध्ये गर्लफ्रेन्ड बरोबर लाट्टे कॉफी आणि कपॅचिनो तासनतास बसून गर्लफ्रेन्डच्या डोळ्यांत डोळे घालून रिचवली. पुढे पुन्हा काळानुरूप मैत्रीणी बदलल्या पण सी सी डी ची चव मात्र तिच राहिली. आता सुन्या नोकरीला लागलाय. कॅफे कॉफी डे च्या त्या जागेवर आता चायोज मध्ये बसून सुन्या बिजीनेस मिटिंग हॅण्डल करतो. कधी चायोजचा फ्री वायफाय वापरत प्रेझेंटेशन बनवतो. टाईमझोनच्या क्लायंट्सशी झूमटीम मीट वर कॉन्फरन्स कॉल वर जातो. वर्चूवली कनेक्ट होतं जातो. ह्या सगळ्या बदलात सुन्या स्वत:ला बदलून घेतोय. फक्त एक गोष्ट बदलली नाहीये. पितळेचे कूपन घेऊन म्हणा किंवा कॅफे कॉफी डे चे बिल पेड करुन म्हणा किंवा गेला बाजार चायोजचे चेक पेड करुन तो न चुकता दत्ताच्या देवळात जातो. दत्ताच्या पाया पडतो आणि जिभेवरची कॉफीची चव उतरण्याच्या आत तो तडक स्प्लेंडर काढून हनुमान रोडाच्या दुसऱ्या टोकाला पार्लेश्वरामध्ये जाऊन गणेशाकडे जातो आणि देवाशी मागणे मागतो ते एकच हा जन्म पार्ल्यात दिलास तसा मुक्ती न मिळता पुढला जन्म दिलास तर तो सुद्धा पार्ल्यातच दे.

**सी.ए.केदार अनंत साखरदान्डे**
९८३३४ ७७२३३

## निहार शेंबेकरची भरारी

'समायरा' हा मराठी सिनेमा २६ ऑगस्ट २०२२ ला रिलीज झाला. समायराचं संगीत दिलंय नव्या दमाच्या तरुण संगीतकाराने - निहार शेंबेकर - जो आपला पार्लेकर आहे. हा निहारचा संगीतकार म्हणून पहिला चित्रपट नव्हे. पहिला चित्रपट 'गणवेश' हा होता ज्यातील 'मोल' हे गाणे आणि 'कारभारी' ही लावणी अतिशय गाजली होती.

आजोबा जयवंत कुलकर्णी ह्यांच्या कडून गायनाचे धडे आणि संस्कार मिळालेला निहार कायमच विविध वाद्ये वाजवणे, शिकणे, निरनिराळ्या प्रकारे रियाज करणे ह्यात व्यस्त असतो. आईवडीलही गेली अनेक वर्षे संगीतसेवा करत आहेत. असा निहार जेव्हा या चित्रपटाचे संगीत करतो तेव्हा निरनिराळ्या बाजाची गाणी आकाराला येतात. एक 'आला रे हरी आला रे' हे गाणे त्याने स्वत: गायले सुद्धा आहे. तर 'सुंदर ते ध्यान' या अनमोल अभंगाला निराळा स्वरसाज लावलाय. एक प्रार्थना आहे, एक सुंदर थीम सॉंग 'पुंडलिक वरदे' आहे. ह्या सिनेमाचे दिग्दर्शक रूषी देशपांडे हे ही पार्लेकरच !

विविध गाण्यांनी नटलेली ही कथा पडद्यावर पाहायला मराठी प्रेक्षक सिनेमाघरात जायला हवे आहेत. मराठी सिनेमा जगवू, वाढवू, तगवू, जोपासू. नव्या कलाकारांना पाहू, ऐकू आणि नंतरच मत बनवू.







तुमचे Investment
आणि Insurance
विषयीचे प्रश्न आम्हाला ई-मेल करा.
Email: expert.talks@parlebazaar.com

- Life Planning
- Life Insurance
- Child Education
- Lifetime Income
- Health Insurance

**Arvind Prabhu**
Insurance and Wealth Engineer ™
Licentiate Insurance Institute of India

Agencies: LIC, TATA AIA
B.E., PG Software Tech, MBA HR, CQA
Fellow IOD, EC LUGI, Angel Invest ALR

9967632222
drarvindprabhu@gmail.com

Scan QR Code for Q&A related to Finance and Investment

# महात्मा फुले मंडई (क्रॉफर्ड मार्केट)

वस्तू घाऊक प्रमाणात विकत घ्यायची झाली की जुन्या मुंबईकरांचे पाय क्रॉफर्ड मार्केट कडे वळत. आजही क्रॉफर्ड मार्केट परिसर हा घाऊक वस्तूंच्या खरेदीसाठी सतत गजबजलेला असतो. या मार्केटची वास्तू १८६९ साली श्री. विलियम्स इमर्सन यांनी डिझाईन करून बांधून पूर्ण केली. श्री. क्रॉफर्ड हे पूर्वीच्या मुंबईचे महानगरपालिकेचे आयुक्त. त्यांच्या



दीर्घोद्योगाचे स्मरणार्थ या मार्केटला त्यांचे नाव दिले गेले. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर याचे महात्मा फुले मंडई असे नामांतर झाले असले तरीही आजही हा परिसर क्रॉफर्ड मार्केट परिसर म्हणूनच ओळखला जातो.



जरासा खडबडीत कुर्ला जातीच्या दगडाच्या खांडकी या वास्तूच्या उभारणीसाठी वापरल्या आहेत. मात्र कोपऱ्यांसाठी पोरबंदर जातीचा दगड असून त्याची शोभा लाल वसई दगडाने वाढवली आहे. ही वास्तू मार्केटसाठी बांधलेली असल्याने मधोमध मोकळे विस्तीर्ण अंगण ठेवून त्यावर उभारलेल्या १२८ फुटी मनोरा ठेवला आहे. मार्केटला तीन मोठी प्रवेशद्वारे असून प्रत्येक दारापाशी संगमरवरी पट्टी बसवलेली आहे. त्यावर श्री. जे. लॉकवुड किपलिंग यांनी घडवलेल्या सुबक शिल्पाकृती बासरीलीफ शैलीत बसवलेल्या आहेत. या शिल्पाकृती त्या काळात हिंदुस्थानात घडवलेल्या सर्वात मोठ्या शिल्पाकृती होत्या. बॉम्बे बिल्डर या नियतकालिकाने एप्रिल १८६९ च्या अंकात या शिल्पाकृतींची स्तुती केली आहे.

मार्केटमध्ये शिरल्यावर एक सुरेख दगडी कारंजे दिसते. ते सर कासवजी जहांगीर या परोपकारी उद्योगपतीने दिलेली भेट आहे. आत मार्केटच्या दोन्ही पाख्यांत एक सारखी दुकानांच्या ओट्यांची रांग आहे. फळे, भाजीपाला, मसाले आदी दुकाने यात वसली आहेत. स्वच्छ करायला सोप्या अशा फ्लॅगस्टोन फरशा या मार्केट साठी मुद्दाम आयात केल्या गेल्या. मार्केटमध्ये थंडावा राहावा म्हणून इमारतीला दोन पदरी लोखंडी छत असून ते उंच लोखंडी स्तंभांवर तोलले आहे. बाहेरच्या मोकळ्या जागेतील पूर्वी असलेला फळफळावळीचा घाऊक बाजार आता नवी मुंबईत स्थलांतरित झाला आहे. या मोकळ्या जागेत एक नमुनेदार नक्षीकाम केलेले कारंजे आहे. ज्यावर स्थानिक पशुपक्षी, देवदेवता यांची शिल्पे कोरली आहेत. पण दुःखाची बाब अशी की फ्लोरा फाउंटन प्रमाणेच हे कारंजेही रंगवून त्याची शोभा नाहीशी केली गेली आहे. शेजारीच पाळीव पक्षी, मासे इत्यादींचा बाजार आहे इथे जुन्या धाटणीचा वातकुक्कुट मटन मार्केटच्या छपरावर



बसवलेला आहे. मार्केटची पूर्वेकडील सीमा दर्शवणारे घडीव लोखंडाचे कठडे अजूनही आपली आब सांभाळत घट्ट उभे आहेत.

आज मुंबईच्या वाढत्या गरजा लक्षात घेता प्रत्येक विभागात, उपविभागात, उपनगरात मार्केटवसले आहे. तरीही क्रॉफर्डमार्केट अस्सल मुंबईकराच्या मनात मात्र ठाण मांडून बसले आहे.

**संगीता बेहेरे**
**९८६७७५८३१०**
**(फोर्टमध्ये फिरताना - भालचंद्र हर्डीकर)**

# रंगुनी रागांत साऱ्या

अभिजात संगीत हा फार मोठा आणि हृद्य विषय आहे. लहानपणापासून कानावर पडलेल्या श्रुती आणि संस्कार यांच्या आधारे 'राग' या विषयावर काही लिहित आहे.

राग ज्ञान हे खूपच मोठे शास्त्र आहे. कोणीही कितीही अभ्यास केला तरी अजूनही खूप शिकणे बाकी आहे हेच कळते. राग या शब्दाचा अर्थ रंग असा आहे. आपण रागरंग अस म्हणतो ना? संगीतातला रंग म्हणजे बहुतेक मूड असा घेऊ. थोडक्यात काय तर एखाद्या संगीताने जी विशिष्ट वातावरण निर्मिती, मनस्थिती निर्माण होते त्याला राग म्हणूया.

आपल्या अभिजात संगीतात सात मुख्य स्वर आणि बावीस श्रुती आहेत. गाण्यात काही ठराविक स्वर आणि तेवढेच असतील तर तो राग मानला जातो. अर्थातच नुसते तेच स्वर असूनही जर सूर जसे म्हटले जातात (रागाचे चलन) ते वेगळे असेल तर राग वेगळा. मियाकी मल्हार आणि बहार यांचे सूर सेम आहेत पण चलन वेगळे. स्वर्गीय तानसेन यांचे पुत्र बिलासखान हे तानसेन मरण पावल्यावर श्रध्दांजली म्हणून भैरवी गायला बसले. ते जे भैरवी म्हणून गायले ते सूर बरोबर होते पण चलन वेगळे म्हणून वेगळाच राग निर्माण झाला. त्या रागाचे नाव त्यांच्याच नावावरून पडले 'बिलासखानी तोडी'.

आपल्या संगीतात किती राग आहेत या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. सर्वसाधारणपणे तीनशेच्या जवळपास माहिती असलेले राग आहेत. राग एवढे आहेत म्हणून त्यांचे 'थाटात' वर्गीकरण करणे जरूरी वाटले. प्रत्येक थाटात एकाच पद्धतीचे अनेक राग धरले जातात. हे दहा थाट, भैरव, बिलावल, तोडी, आसावरी, कल्याण, खमाज, पूर्वी, मारवा, काफी आणि भैरवी. राग गायची वेळ आणि ऋतु याचे काही ठरलेले संकेत आहेत. स्वर्गीय विष्णू भातखंडे यांनी या श्रेत्रात मोलाची कामगिरी केली आहे. हे जणू कमी पडले म्हणून दोन तीन राग एकत्र करून वेगळ्या जोड रागांची निर्मिती होतच आहे.

आता मुख्य गंमत, रागाचे सूर कळले तरी रागाचे चलन नीट कळायला आणि जमायला हवे. याच सुरावटीची विशिष्ट चलन घेऊन केलेली एखादी संगीत रचना (composition) म्हणजेच चीज. रागाची लक्षणे दाखवणारी रचना करायला किंवा गायला गुरु हवाच. ख्यातनाम गायकांच्या पोतडीत प्रत्येक रागाच्या असंख्य चीजा तयार असतात. जितक्या चीजा जास्त तेवढी गुरूची संपन्नता मानली जाते. असे श्रीमंत गुरूदेखिल चांगल्या शिष्यांच्या शोधात असतात. एक महत्त्वाचे म्हणजे आपण बघितले की राग म्हणजे रंग किंवा मूड. तेव्हा हा प्रकारच subjective आहे. इथेच घराणे जन्माला येते. एकाच रागाची एकच रचना किंवा चीज दोन वेगळ्या घराण्याचे गायक गातात तेव्हा वेगळी अनुभूती येते.

आता रागांच्या व्यक्तीमत्त्वाबाबत. काही

पान १० वर



## Engineering College Admissions
## MHT-CET स्कोअरद्वारे चांगल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश कसा मिळवावा?

प्रा. मनीष नाडकर्णी (Sharpwell Tutorials)

MHT CET (पदवी अभियांत्रिकी) निकाल १५ सप्टेंबर, २०२२ रोजी अपेक्षित आहे. विद्यार्थी CET सेल वेबसाइटवर त्यांचे पर्सेंटाइल स्कोअर पाहू शकतील. या स्कोअरमुळे ते महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी पात्र ठरतील. महाराष्ट्रातील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्रवेश CAP (केंद्रीकृत प्रवेश प्रक्रिया) द्वारे होतात. सर्व महाविद्यालयांमध्ये एमएचटी सीईटी स्कोअरच्या आधारे प्रवेश दिले जातात. या व्यतिरीक्त VJTI आणि SPCE वगळता सर्व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या JEE मेन स्कोअरच्या आधारेसुद्धा कोटा आहे.

हा निकाल लागताच अभियांत्रिकी महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. मुंबई आणि मुंबईच्या आसपास 60 हून अधिक अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. ही महाविद्यालये संगणक अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, केमिकल, सिव्हिल इ. सारखे अनेक पदवी अभ्यासक्रम राबवतात. अलीकडे अनेक महाविद्यालयांनी आर्टिफिशियल, इंटेलिजन्स, मशीनलर्निंग, डेटासायन्स, सायबर सुरक्षा, मेकॅट्रॉनिक्स इत्यादी नवीन शाखा सुरू केल्या आहेत. या शाखा उद्योगक्षेत्रातील मागणी लक्षात घेऊन सुरू केल्या गेल्या आहेत.

धार्मिक अल्पसंख्यांक (मुस्लिम, ख्रिश्चन, जैन) किंवा भाषिक अल्पसंख्यांक (गुजराती, सिंधी, तमिळ इ.) या प्रवर्गातील विद्यार्थी त्यांच्या विशिष्ट अल्पसंख्यांक संस्थांमध्ये ५१% आरक्षणाचा लाभ घेऊ शकतात. अनेक महाविद्यालयात कमकुवत आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी, TFWS (ट्यूशन फी माफी योजना) आणि EWS (आर्थिकदृष्ट्या कमकुवत विभाग) योजना यासारख्या योजना आहेत. (मात्र) या योजनांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडे योग्य आधारभूत कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील कोणत्याही अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी विद्यार्थ्यांना वेगवेगळे फॉर्म न भरता एकच ऑनलाइनफॉर्म भरावा लागेल. या फॉर्ममध्ये विद्यार्थ्यांना प्राधान्यक्रमानुसार ३०० पर्यंत कॉलेज आणि शाखांचे पर्याय देता येऊ शकतात. म्हणूनच फॉर्म भरणे अतिशय महत्त्वाचे आहे, कारण फॉर्म मधील महाविद्यालयाची निवड चुकल्यास विद्यार्थ्याला त्याचे परिणाम पुढील चार वर्ष भोगावे लागणार आहेत. चांगले महाविद्यालय मिळाल्यास सहाजिकच चांगल्या शैक्षणिक सुविधा, उत्कृष्ट शिक्षक आणि कॉलेजचे नाव या जोरावर विद्यार्थ्याला चांगली नोकरी मिळणे सहज शक्य होते. अनेक चांगल्या महाविद्यालयात विद्यार्थी पदवीधर होण्यापूर्वीच ( शेवटच्या वर्षात असतांनाच) त्याची निवड नोकरीसाठी केली जाते आणि यासाठीच चांगले महाविद्यालय आपल्या पाल्यांसाठी निवडणे फार महत्त्वाचे आहे.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे MH-CET स्कोर वरून विद्यार्थ्यांना कोणत्या ब्रांच मध्ये प्रवेश मिळू शकतो याचं आकलन करून घेणे आवश्यक असते.याबाबतीत योग्य ती व्यूहरचना (स्ट्रॅटेजी) यासंबंधी अनुभव असणाऱ्या प्राध्यापकांकडून मिळवल्यास फार उत्तम ठरेल.

CAP फेऱ्यांद्वारे भरलेल्या जागांच्या व्यतिरिक्त, विनाअनुदानित महाविद्यालयांमधील २०% जागा महाविद्यालय स्तरावर भरल्या जातात. याला इन्स्टिट्यूट कोटा म्हणतात. बऱ्याचदा, विद्यार्थ्यांचे MHT CET स्कोअर CAP राऊंड मधील क्लोजिंग स्कोअरपेक्षा कमी असले तरीही त्यांना इन्स्टिट्यूटकोट्याद्वारे प्रवेश मिळू शकतो. विद्यार्थ्यांनी प्रयत्न करून मुंबईतील उच्च अभियांत्रिकी महाविद्यालयांना लक्ष्य केले पाहिजे. व्हीजेटीआय, एसपीसीई, एसपीआयटी, आयसीटी, डी जे संघवी, थडोमल, विवेकानंद, फादर ॲग्नेल, इत्यादी महाविद्यालये मुंबई विद्यापीठांतर्गत सर्वात जास्त मागणी असलेली आहेत. या शीर्ष महाविद्यालयांमध्ये केवळ चांगल्या पायाभूत सुविधा आणि चांगले शिक्षक आहेत असे नाही तर पदवीधर विद्यार्थ्यांना विलक्षण प्लेसमेंट देखील मिळतात. तसेच पुढील शिक्षण परदेशी विद्यापीठांमध्ये घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, या उच्च महाविद्यालयांतील नामांकित आणि वरिष्ठ प्राध्यापकांनी दिलेली शिफारस पत्रेही खूप उपयुक्त असतात. उच्च श्रेणीतील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश, विद्यार्थ्यांना एक फायदेशीरकरिअरची उत्तम सुरुवात करण्याचे आश्वासन आहे.

अधिक माहितीसाठी ९८२०९९३७७० वर संपर्क करावा.

पान ९ वरून

### रंगुनी रागांत साऱ्या

राग आनंदी, खेळकर काही धीर गंभीर, काही रोमँटिक तर काही विरही. रागांची सुरावट अशी असते की त्याचा चेहरा दिसतोच. मारवा हा आर्तच असतो, बहार खेळतच येतो आणि भीमपलास अभंग गातच. एका शोध निबंधा प्रमाणे काही राग हे शांती आणि सुख वाढवितात, हंसध्वनि, तिलक कामोद, देश, यमन, रागेश्री, जोग वगैरे तर काही राग दुःख, विरह, चिंता, मालकंस, श्री, मारवा, ललत, तोडी वगैरे. एक correlation असे निघाले कि सर्व शुध्द स्वर असणारे बहुतेक राग शांत, सुखी आणि एखादा कोमल स्वर असणारे दुःखी, विरहित आणि चिंतातूर. त्यात सुध्दा कोमल रिषभ असलेले राग यात प्रमुख. बहुतेक म्हणूनच हे राग गझल मधे जास्त वापरले जातात. संगीताचा वापर मानसिक रोग उपचारासाठी ही नक्की करतात.

रागदारी ही फक्त classical गायकीची मक्तेदारी नाही. सिने संगीतात याच रागांवर आधारित असंख्य गाणी आहेत जी बरीच वर्षे होऊनसुध्दा अजूनही लोकप्रिय आहेत. पूर्वीच्या काळी बऱ्याच सामान्य नटाना या गाण्यांमुळे टिकून राहता आले आणि प्रसिद्धी ही मिळाली. चित्रपटात विशेष लोकप्रिय राग भैरवी, पहाडी, यमन किंवा कल्याण. इतरही अनेक राग वापरले गेले आहेत.

पुढच्या क्रमशः लेखात सकाळ ते रात्री गायल्या जाणाऱ्या एक एक रागांची माहिती आणि आधारित गाणी वाचुया.

मिलिंद जोशी
९८१९७ ९७२५८

## थोर शास्त्रज्ञांची ओळख लेखमाला
## भाग १ जॉन डाल्टन

डाल्टनच्या संशोधनामुळे रसायनशास्त्रात गणिती सूत्रांचा उपयोग सुरू झाला. तसेच रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र हे विषय एकमेकांच्या जवळ आले.

१७६६ साली एका गरीब कुटुंबात जन्मलेल्या (ज्याच्या जन्माची तारीख नक्की कोणालाच माहिती नव्हती बहुधा ती सहा सप्टेंबर असावी) डाल्टनला विज्ञानात खूपच रस होता. त्याचे मुख्य गुण प्रचंड चिकाटी आणि सातत्य होते. अगदी लहानपणापासूनच त्याने हवामानाची मोजमाप करून त्याच्या नोंदी करायला सुरुवात केली ते अगदी मरेपर्यंत (अगदी त्याच्या मृत्यूच्या दिवशी सुद्धा त्याने त्या नोंदी केल्या होत्या!). एकूण त्यांनी अशी दोन लाख निरीक्षणं केलेली होती.

डाल्टननी वायुंवर आणि वायुंच्या मिश्रणांवर अनेक प्रयोग केले. वायूचे तापमान (temperature), आकारमान (volume) आणि दाब (प्रेशर) यांच्यातले संबंध तपासून १८९१ मध्ये त्यांनी पार्शलप्रेशरचा नियम शोधून काढला. एखाद्या बंद भांड्यात अनेक वायूंचे मिश्रण ठेवलं असलं तर त्या मिश्रणाचा दाब किती असेल याचा नियम त्याने शोधला.

त्याच भांड्यात, त्याच तापमानाला त्या वायुंच्या मिश्रणातील प्रत्येक वायु जर वेगवेगळा ठेवला (तेवढयाच आकारमानाच्या पात्रामध्ये) तर जो दाब त्या प्रत्येक वायुचा पडेल (त्याला डाल्टननीपार्शलप्रेशर अशी संज्ञा दिली. ह्या सगळ्या दाबांची (पार्शलप्रेशरची) बेरीज म्हणजेच त्या वायुंच्या मिश्रणाचा दाब असेल असे त्याने सिद्ध केले. (बारावीच्या अभ्यासक्रमात हा डाल्टनचा नियम आहे.)

डाल्टन सगळ्यात मोठा ठरतो तो त्याच्या अणूविषयीच्या सिद्धांतामुळे. प्रत्येक पदार्थ हा वेगवेगळ्या प्रकारच्या अणुंपासून बनलेला असतो. एका मूलद्रव्याचे सर्व अणु हे वजनाने एकसारखेच असतात तसेच अविभाज्यही असतात. अणू तोडता किंवा कापता येत नाहीत, आणि एकाच पदार्थाचे सर्व अणू एकसारखेच असतात असे त्याचे म्हणणे होते. मूलद्रव्याच्या प्रकारानुसार त्यांच्या अणुंचे वजनही वेगवेगळे असते असे त्याने मांडले. १८०८ साली, डाल्टनने 'न्यू सिस्टीम ऑफ केमिकल फिलॉसॉफी' हे पुस्तक लिहिले, त्यात वेगवेगळ्या मूलद्रव्यांच्याअणूंच्या वजनांची यादीही दिली आहे. हे करताना हायड्रोजनच्या अणूचे वजन एक धरून त्याच्या वजनाच्या तुलनेने मग इतर मुलद्रव्यांची वजने मांडलेली होती. त्याकाळी हे तत्व मोठ्या विद्वानांनाही पचवायला जड गेले होते. तसंच अनेक अणूंपासून संयुक्त अणू किंवा रेणू (किंवा मॉलेक्युल) बनू शकतो असं तो म्हणे, उदाहरणार्थ मिथेन वायु संयुग असून हा कार्बन आणि हायड्रोजनमुळे(च) बनत असून सदर मूलद्रव्यांचे वजनी प्रमाण ३:१ एवढे असते तर इथेनमध्ये हेच प्रमाण वेगळे (४:१) असते. यालाच डाल्टनचा 'लॉ ऑफ मल्टिपलप्रपोर्शन्स' असे म्हणतात. हे त्यांनी १८०३ मध्ये मांडले.

पान १२ वर

## पार्लेश्वर मंदिरात अथर्वशीर्ष पठण



संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानाच्या विलेपार्ले विभागाचा अथर्वशीर्ष पठण कार्यक्रम मंगळवार दिनांक ६ सप्टेंबर रोजी पार्लेश्वर गणपती मंदिर येथे सायंकाळी ४.३० ते ६ या वेळात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात एकात्मता मंत्राने झाली. कार्यक्रमाला ६० जण उपस्थित होते. महानगर कार्यकारिणी सदस्या सौ. अलका ताई गोडबोले ही कार्यक्रमाला उपस्थित होत्या. पठणाची २१ अवर्तने केली. कार्यक्रमात काही रक्कम प्रतिष्ठानला देणगी म्हणून मिळाली. गणेशाची आरती करून सर्वांना पेढे, लाडू आणि गुळपापडीचा प्रसाद देवून कार्यक्रमाची सांगता झाली.




# सांस्कृतिक दरोडेखोरी

देशोदेशी

तुम्ही जर ग्रीस मध्ये अथेन्सला भेट दिली असेल तर ॲक्रोपोलिस आणि त्यातील जगप्रसिद्ध पार्थेनॉन नक्कीच बघितलं असणार. पण तुम्हाला पार्थेनॉनचं गत वैभव पूर्णपणे अनुभवायचं असेल तर फक्त अथेन्सला जाणं पुरेसं नाही. कारण एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच अर्ध्याहून अधिक पार्थेनॉन त्याचे तुकडे, तुकडे करून लॉर्ड एल्जिन ह्या ब्रिटिश उमरावाने चोरून इंग्लंडला नेलं.

①


युरोपमध्ये भटकताना आणि तिथल्या म्युझियम किंवा प्रासादांतील थक्क करणाऱ्या कलाकृती पाहताना, त्यातील कित्येक कलाकृती म्हणजे असाच एल्जिनसारख्यानी सर्व जगात ठिकठिकाणी टाकलेल्या डाक्यातील माल आहे आणि ही दरोडेखोरी किती मोठ्या प्रमाणात आणि किती दीर्घ काळ केली गेली ह्याची सुरुवातीला मला अजिबात कल्पना नव्हती. त्याची जाणीव व्हायला लागली युरोप बाहेरच्या - आपल्या भारतासकट इजिप्त, कंबोडिया, पेरू अश्या दूरदूरच्या देशात फिरताना, तेथील भग्नावशेष समोर आल्यावर.

②


साधारण सोळाव्या शतकाच्या सुरुवातीपासून ते एकोणिसाव्या शतकाच्या शेवटापर्यंत, छोट्याश्या युरोपमधील विविध राज्यांनी सर्व जगावर सत्ता गाजविली आणि ह्याकाळात आपल्या जगभरातील वसाहतींतून अगणित संपत्ती त्यांनी आपल्या देशात नेली. आज श्योनब्रून (Schönbrunn), व्हर्साय (Versailles) किंवा बकिंगहॅमच्या राजवाड्यांत जे वैभव आपल्याला दिसतं त्याचं मूळ अश्या लुटलेल्या धनसंपत्तीतच आहे.

अर्थात जित समूहांच्या संपत्तीची लुटालूट जेत्यांनी करण्याचा प्रघात पूर्वापार सर्वत्र चालत आलेला आहे - मग ती सोळाव्या शतकात स्पेनने केलेली पराभूत इंका साम्राज्याची लूट असो, किंवा चौथ्या शतकात मगधाच्या गुप्त साम्राज्याने माळवा आणि गुजरातेतील राज्ये जिंकून केलेली असो.

पण एखाद्या जित राष्ट्राचा सांस्कृतिक वारसाच - त्याच्या ऐतिहासिक आणि भावनिक मूल्याचा विचार न करता, तोडफोड आणि प्रसंगी त्यांचा विध्वंस करून, केवळ शोभेच्या वस्तू म्हणून पळवून नेण्याचा प्रघात मात्र युरोपातच घातला गेला असं वाटतं.

आपण पार्थेनॉन पासूनच सुरुवात करू. पार्थेनॉनमधील कलाकृतींची लूट १२ वर्षे सातत्याने चालू होती - संगमरवरी मूर्ती, कोरीव काम केलेल्या चित्रपट्ट्या (friezes), भिंती फोडून काढलेले कलाकुसरीने भरलेले तुकडे, जमीन खणून उचकटलेले स्तंभ, जहाजं भरभरून लॉर्ड एल्जिनने इंग्लंडला नेले. त्याचं एकच उदाहरण आपण थोड्या विस्ताराने पाहू.

पार्थेनॉन आज कश्या अवस्थेत दिसतं त्याचा हा पहिला फोटो पहा. पार्थेनॉनचे उतरते छप्पर आणि त्याचे भव्य स्तंभ ह्या मधील त्रिकोणी पोकळी एकेकाळी अतिशय सुंदर शिल्पांनी पूर्ण भरलेली होती. त्यांची वर्णनं अथेन्सच्या वैभवकाळात तिथे गेलेल्या प्रवाश्यानी लिहून ठेवली आहेत. ह्या दोन (पूर्व आणि पश्चिमेच्या) त्रिकोणांमध्ये एकूण ५० पुतळे होते. पूर्वेला देवी अथेनाच्या जन्माच्या प्रसंगाचं चित्र होतं (दुसरा फोटो) - मध्यभागी देवाधिदेव झूस सिंहासनावर आणि त्याच्या एका बाजूला हेरा, झूसची पत्नी आणि दुसऱ्या बाजूला अथेना, त्यापुढे हातात त्रिशूल घेतलेला पोसायडॉन, वीणा (lyre) घेतलेला अपोलो असे अनेक देव/देवतांचे पुतळे होते. पश्चिमेला, अथेन्सवर कुणाची सत्ता असावी ह्यासाठी अथेना आणि पोसायडॉन ह्यांच्यात झालेल्या युद्धाचा प्रसंग दाखविलेला होता. अर्थात त्यात अथेनाचा विजय झाला (म्हणूनच जिथे युद्ध झालं त्या गावाचं नाव अथेन्स!). मध्यभागी अथेनाने अथेन्सच्या नागरिकांना भेट दिलेल्या ऑलिव्हच्या झाडाची आकृती होती. (तिसरा फोटो). मात्र ह्या अप्रतिम शिल्पातील एक तुकडा सुद्धा तुम्हाला आज अथेन्स मध्ये पाहायला मिळणार नाही - तिथे आहेत फक्त दोन लहान पण प्रमाणशीर प्रतिकृती, आधुनिक काळात बनविलेल्या. मूळ कलाकृती पाहायला तुम्हाला जावं लागेल एल्जिनमार्बल्स नावाचं ब्रिटिश म्युझियम मधील प्रदर्शन पाहायला. ह्या एल्जिनमार्बल्स मधील प्रत्येक वस्तू जरी चोरून आणलेली आहे हे सर्वमान्य असलं, तरीही ब्रिटिश सरकारने सतत ते त्यांच्या मूळ मालकांना (ग्रीस) परत द्यायला नकार दिलेला आहे!

③


आता हा चौथा फोटो पहा. तुम्ही जर इटलीमध्ये रोमला गेला असाल तर सम्राट ऑगस्टस (किंवा हॅड्रियन - ह्याबद्दल इतिहासात थोडं दुमत आहे) ह्याने बांधलेलंपँथिऑन नावाचं २००० वर्षांपूर्वीचं रोमन देऊळ नक्कीच पाहीलं असेल. पण त्यासमोरच्या चौकात एक सुंदर कोरीव कामाने सजविलेला उंच स्तंभ तुम्ही निरखून पाहिला आहे का? हा इजिप्तमधून पळवून आणलेला स्तंभ आहे. हा मुळात इजिप्तचा सम्राट रामसेस दुसरा ह्याने (आजच्या कैरो जवळ) बांधलेल्या सूर्यदेवाच्या (Rea) देवळाच्या प्रवेशदारात होता. बहुधा रोमन सेनानी पॉम्पे ह्याने तो पळवून रोमला नेला. कर्नाक ह्या इजिप्तच्या प्रसिद्ध देवालय समूहातील राजा तुतमोस तिसरा ह्याच्या देवळाबाहेरील दोन स्तंभही असेच रोमन सेनापतींनी पळविले. त्यातील एक रोममधील

④


पियाझा सान जिओव्हानी ह्या चौकात तुम्हाला दिसेल. मी जेंव्हा तो प्रत्यक्ष पाहिला तेंव्हा ही त्याची पूर्वपीठिका मला माहीतच नव्हती त्यामुळे मी त्याचा फोटो सुद्धा घेण्याचे कष्ट घेतले नाहीत. दुसरा (पाचवा फोटो) आज इस्तंबूलमधील सुलतान अहेमत चौकात आहे (आजचा टर्की देश एकेकाळी रोमन साम्राज्याचा भाग होता). इजिप्तमधील लक्झरच्या देवळाबाहेर सम्राट रामसेस दुसरा ह्याने उभारलेल्या दोन स्तंभांपैकी एकच त्याच्या मूळ जागी आहे (सहावा फोटो), दुसरा असाच फ्रेंच लोकांनी पळवून नेला. जो आज पॅरिसमध्ये कॉंकॉर्ड चौकात (Place de la Concorde) आहे. तो सुद्धा मी जेंव्हा पाहिला तेंव्हा त्याच्याही ऐतिहासिक महत्वाची अजिबात जाणीव नसल्याने मी त्याचा फोटो घेतला नाही! चोरून आणलं ते आणलं, पण त्यांचं ऐतिहासिक महत्व पूर्णपणे पुसून टाकून जणूकाही आपणच ह्या कलाकृतींचे शिल्पकार आहोत असा आभास निर्माण करण्यात आला.

मी मुद्दामच आपल्या देशातही झालेल्या अश्या लूटमारीची उदाहरणं इथे दिली नाही. एकतर त्याची आपल्याला थोडीफार तरी माहिती आहे. पण मुख्य म्हणजे ही सांस्कृतिक दरोडेखोरी केवळ एखाद्याच प्रदेशापुरती मर्यादित नव्हती, तर त्याची व्याप्ती जगभर होती हे सांगण्याचा माझा मुख्य उद्देश होता. अश्या दरोडेखोरीची उदाहरणं लिहायला बसलो तर अजून कितीतरी पानं भरतील - कंबोडियातील प्रीहखान (Preah Khan) देवळासमोर सागर मंथनाचं अद्वितीय शिल्प आहे, त्यातील सर्व देव आणि असुरांच्या मूर्तींची डोकीच फक्त



कोणीतरी कापून पळवून नेली आहेत. पेरूतील कुस्को मधल्या कोरिकांचा ह्या इंका देवळातील कलाकृती त्या शुद्ध सोन्याच्या बनविलेल्या असल्यामुळे स्पॅनिश लोकांनी त्या वितळवून त्याची नाणी पाडून स्पेनला पाठवून दिली. लिहावं तितकं थोडंच. आणि ही सर्व फक्त मी स्वत: पाहिलेली उदाहरणं. मी न पाहिलेली अशी





⑦

उदाहरणं त्यापेक्षा शेकडो/हजारो पटींनी अधिक आहेत.

धर्मांधता आणि सत्तान्धता ह्या दोन्ही मुळे



⑤

आपल्याच कलाविष्कारांचा नाश वेगवेगळ्या समूहांनी सर्वत्र केला. कुठलाही गट किंवा समाज त्याला अपवाद आहे असं म्हणता येणार नाही. मग ह्या लेखात मी फक्त युरोप बद्दलच का लिहिलं ? आपण फार उदारमतवादी आहोत आणि आपणच जगातील सर्व'मागास आणि रानटी'समूहांना (आशिया, आफ्रिका आणि अमेरिकेतील) संस्कृती म्हणजे काय हे शिकवलं असा ढोंगी दावा सर्वच युरोपियन देशांनी वेळोवेळी आपल्या वसाहतवादाचं समर्थन करताना केला आहे. पण त्यांच्याही माजघरात, त्यांच्या दरोडेखोरीची अशी अगणित मढी लपविलेली आहेत आणि त्याची कबुली कोणीही कधीही दिलेली नाही, एव्हढंच.

**सतीश जोशी**
९८२०२२८२७९

पान १० वरून

## थोर शास्त्रज्ञांची ओळख लेखमाला भाग 1 जॉन डाल्टन

(अकरावीच्या अभ्यासक्रमात हा डाल्टनचा नियम आहे.)

एकाच प्रकारचे अणूही एकत्र येऊन त्यांचे रेणू (किंवा मॉलेक्युल) बनू शकतात हे मात्र डाल्टनला कळलं नव्हत, उदा. २ हायड्रोजनचेअणू एकत्र येऊन त्याचा हायड्रोजनचा मॉलेक्युल ($H_2$) बनू शकतो हे त्याला माहिती नव्हतं. म्हणूनच पाणी या संयुगाचे रासायनिक सूत्र ( फॉरम्युला) काढताना, त्याने एक अणूहायड्रोजनचा आणि एक अणू ऑक्सिजनचा मिळून पाणी बनवतात असे गृहीत धरून पाण्याचा फॉरम्युला HO असा मांडला होता.

डाल्टन यांच्या कल्पनांकडे त्याकाळी वैज्ञानिकांचे दुर्लक्ष झालं. (या कल्पना सर्वमान्य होण्यासाठी पुढची शंभर वर्षे गेली काही त्रुटी सुधारून डाल्टनच्या अणू बाबतच्या संकल्पना हा मोठा टप्पा ठरला.)

विज्ञान संशोधना विषयीच्या विचारात डाल्टन एवढा मग्न असे की त्याने लग्न केले नाही. डाल्टन रंगांधळा होता. त्याला गुलाबी आणि निळा रंगातील फरक कळत नसे. त्याच्या रंग आंधळेपणाच्या अनेक (दंत)कथा पसरल्या आणि पुढे पुढे रंगांधळेपणाला डाल्टनीजम असंच म्हणण्याचा प्रघात पडला.

२७ जुलै १८४४ रोजी त्याचं निधन झालं. आज जवळ जवळ २०० वर्षा नंतर देखील डाल्टनच्या नियमांचा उच्च शिक्षण अभ्यासक्रमात समावेश आहे. दुर्दैवाने डाल्टनच्या संशोधनाविषयीची सगळी कागदपत्रे दुसऱ्या महायुद्धात इंग्लंड मधील मँचेस्टरवर झालेल्या बॉम्ब हल्ल्यात नष्ट झाली.

**डॉ. यु आर कापडी**
( गोल्डन गेट टू आय आय टी, विलेपार्ले)
९७६७२ ४४८९१

## बीएमएम च्या अधिवेशनात पार्लेटिविचे सम्मेलन

संकृती व उद्योग ह्यांचा सुंदर मिलाफ साधणारी बृहन् महाराष्ट्र मंडळाची अमेरिकेतील अधिवेशने म्हणजे अमेरिका स्थित मराठी जनांची दर दोन वर्षांनी येणारी



जत्राच जणू! गाण्याच्या मैफिली, नाटके, सेलिब्रिटीजशी गप्पा, औद्योगिक परिषद, प्रदर्शन, अशा बहुरंगी आणि भरगच्च कार्यक्रमात चार दिवस कसे जातात कळत सुद्धा नाही. दरवेळी वेगवेगळ्या शहरांत होणाऱ्या ह्या अधिवेशनाला अमेरिकेच्या विविध भागांतून हजारोंच्या संख्येने मराठी माणसे / कुटुंबे हजेरी लावतात.

दर अधिवेशनात होणारे पार्ले टिळक विद्यालयाचे छोटेखानी गॅदरिंग हे खासच असते. शाळेच्या प्रार्थनेनी सुरु होणाऱ्या गप्पांमधे, शाळेच्या आठवणी जागवण्यात, एकमेकांची ओळख करुन घेण्यात दीड दोन तास कसे निघून जातात पत्ताच लागत नाही. अटलांटिक सिटी मधील अधिवेशनातील पार्लेटिवि गॅदरिंगला सुमारे पन्नास माजी विद्यार्थ्यांनी हजेरी लावली.

## भाऊबळी

झी स्टुडिओजने आतापर्यंत अनेक विविध विषयावरचे चित्रपट प्रेक्षकांना दिले आहेत. 'पांडू', 'धर्मवीर', टाईमपास ३ 'यानंतर आणखी एक सिनेमा घेऊन झी स्टुडिओज सज्ज झाले आहेत. त्या चित्रपटाचे नाव आहे 'भाऊबळी'. झीस्टुडिओज प्रस्तुत, समीर पाटील दिग्दर्शित 'भाऊबळी' हा विनोदी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाचे निर्माते नितीन वैद्य, निनाद वैद्य आणि अपर्णा पाडगावकर आहेत. या चित्रपटाचे ट्रेलर प्रदर्शित झाले असून मनोज जोशी, किशोर कदम, मेधा मांजरेकर, ऋषिकेश जोशी, संतोष पवार आणि अनेक नामवंत कलाकार या चित्रपटात आहेत. दिवंगत ज्येष्ठ नाटककार, पत्रकार आणि लेखक जयंत पवार यांनी लिहिलेला हा शेवटचा सिनेमा आहे. विनोदी तरी मोलाची शिकवण देऊन जाणारा हा सिनेमा असणार असे एकंदर चित्र ट्रेलर पाहून समजते. येत्या १६ सप्टेंबरला मनोरंजन डबल करायला 'भाऊबळी' सिनेमागृहात येत असून ट्रेलर पाहून सिनेमा पाहण्यासाठीची प्रेक्षकांची उत्सुकता अजूनच वाढलेली दिसत आहे.दिग्दर्शक समीर पाटील चित्रपटाच्या ट्रेलरबद्दल म्हणतात, 'झी स्टुडिओजने नेहमीच भव्य दिव्य एकापेक्षा एक सिनेमे दिले आहेत. झी स्टुडिओज 'भाऊबळी' सिनेमा मोठ्या प्रमाणात सर्वत्र प्रदर्शित करेल याची मला खात्री आहे. सर्वच उत्तम कलाकार या सिनेमाला लाभले आहेत. या सिनेमाला सुद्धा प्रेक्षक भरभरून प्रेम देतील अशी मला आशा आहे.'







## आता होऊ दे धिंगाणा

स्टार प्रवाह वाहिनी नेहमीच विविध विषयांवर आधारित नवनवीन कार्यक्रम घेऊ नयेत असते. आता येत्या १० सप्टेंबर पासून स्टार प्रवाह वाहिनीवर एक आगळा वेगळा 'आता होऊ दे धिंगाणा' हा कार्यक्रम सुरु होणार आहे. १० सप्टेंबरपासून दर शनिवार आणि रविवार रात्री ९ वाजता या कार्यक्रमाचा आनंद आपल्याला घेता येणार आहे. जेव्हा जेव्हा कुटुंब एकत्र येतं आणि विसाव्याचे काही क्षण मिळतात तेव्हा अंताक्षरी रंगल्या शिवाय रहात नाही. स्टार प्रवाहचा हा नवा कोरा कार्यक्रम म्हणजे अंताक्षरीचा भन्नाट प्रयोग म्हणता येईल. मराठी परंपरा, मराठी प्रवाह हे ब्रीदवाक्य जपणाऱ्या स्टार प्रवाहच्या या नव्या कार्यक्रमातही मराठी गाण्यांचा आस्वाद घेता येईल. स्टार प्रवाह परिवारातल्या दोन मालिकांच्या टीममध्ये ही अनोखी सांगितीक लढत रंगणार आहे. पण हा नुसता म्युझिकल कार्यक्रम नाही. तर बरेच भन्नाट टास्क आणि कलाकारांच्या पडद्यामागच्या गमती जमती या मंचावर उलगडतील. अभिनेता सिद्धार्थ जाधव या



कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करणार आहे . 'आता होऊ दे धिंगाणा' हा कार्यक्रम म्हणजे फक्त गाण्याचा कार्यक्रम नाही तर यातल्या काही गोष्टी प्रेक्षकांना नवं सरप्राईज देतील.

**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

# वंदेमातरम

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या 'वंदेमातरम' गीतावर आधारित एक कार्यक्रम सहाय्यक पोलीस आयुक्त अविनाश धर्माधिकारी यांच्या 'EDUCULSPORTS' फाऊंडेशन तर्फे २८ ऑगस्ट रोजी पार्ल्यातील दीनानाथ नाट्यगृहात झाला. नासिकच्या 'शब्द मल्हार' संस्थेतर्फे सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमात संहिता लेखक व निवेदक स्वानंद बेदरकर यांनी बंकिमचंद्र यांच्या आयुष्याचा, 'वंदेमातरम'चा व पर्यायाने स्वातंत्र्य लढ्याचा प्रवास अतिशय ओघवत्या शब्दात व अस्खलित वाणीत सादर केल्यान श्रोते मंत्रमुग्ध झाले.

या कार्यक्रमाचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे वंदेमातरम गीताची पाचही कडवी गायक ज्ञानेश्वर कासार व आशिष रानडे यांनी देस, भीमपलास व शुध्द सारंग अशा तीन वेगवेगळ्या रागांत व अतिशय सुरेल पध्दतीने गायली. त्यांना लाभलेली तबला, ऑक्टोपॅड, व की बोर्डची साथही उत्कृष्ट होती. वंदेमातरम कार्यक्रमाला आमदार पराग अळवणी, अभिनेता सचीन खेडेकर, 'एबीपी माझा' चे राजीव खांडेकर, बांधकाम व्यावसायिक डॉ सुधीर निरगुडकर, संगीतकार व गायक श्रीधर फडके तसेच मा.मनोज नाथांनी व मा. अनिल गलगली विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.




# सुमेध वडावाला यांना साहित्यश्री पुरस्कार प्रदान



ज्येष्ठ साहित्यिक सुमेध रिजबूड वडावाला यांना 'युवक बिरादरी'चा साहित्यश्री पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. एक लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

रवींद्र नाट्मंदिराच्या मिनी थिएटरमध्ये १० सप्टेंबर रोजी झालेल्या युवक बिरादरी ऋणानुबंध समारोहात ज्येष्ठ पत्रकार व खासदार कुमार केतकर यांच्या हस्ते साहित्यश्री पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला न्यायमुर्ती सत्यरंजन धर्माधिकारी, राजीव खांडेकर, डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. राजन वेळुकर, वात्रटिकाकार रामदास फुटाणे आदी मान्यवर उपस्थित होते.

कथा, कादंबरी, आत्मकथा अशा वेगवेगळ्या वाङमय प्रकारांवर पकड असलेल्या वडावाला यांनी धर्मयुद्ध, पुस्तक उघडलं, बावन्नकशी हा कथासंग्रह, तृष्णा, ब्रम्हकमळ या कादंबऱ्या , आई ती आईच सारखे आत्मकथनपर लेखन, दोन चांक झपाटलेली हे प्रवासवर्णन अशा विविध साहित्यप्रकारात विपुल लेखन केलं आहे. २०१३ ला खेड येथे भरलेल्या एकदिवसीय ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही वडावाला यांनी भूषवले होते.

# आशिष चौघुले यांचा सन्मान






गेली अनेक वर्षे विविध मॅरेथॉन स्पर्धांमधे आपला ठसा उमटवणाऱ्या आशिष चौघुले याचा बृहन् महाराष्ट्र मंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या अटलांटिक सिटी येथील अधिवेशनात सन्मान करण्यात आला. उत्तर अमेरिकेत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मराठी जनांना ही पारितोषिके देण्यात येतात. आशिष याने शिकागो, बर्लिन, न्युयॉर्क, टोकियो, लंडन व बोस्टन ह्या सहा महत्वाच्या मॅरेथॉन पूर्ण करुन एक विक्रमच प्रस्थापित केला आहे. ह्या सहा मॅरेथॉन पूर्ण करणारा तो पहिला महाराष्ट्रीयन अमेरिकन ठरला आहे.

विशेष म्हणजे पार्लेकर आशिषचा सन्मान मूळच्या पार्लेकरच असणाऱ्या मंडळाच्या अध्यक्षा विद्या जोशी यांच्याच हस्ते करण्यात आला.

# श्री शिवतांडव स्तोत्र



करोना काळात नकारात्मक वातावरणात दिल्ली स्थित सौ.माधुरीताई सहस्त्रबुध्दे ह्यांनी आपल्या FHDAF (Foundation of Holistic Development in Academic Field) संस्थेमार्फत महिलांचं मनोबल उंचावण्यासाठी श्री शिवतांडव स्तोत्र शिकवण्यास सुरुवात केली. त्यांच्या ह्या कार्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. ऑनलाईन पठण वर्गातून सुमारे अडीच हजार महिलांना हे स्तोत्र शिकवून झाल्यानंतर ते पूर्णत्वास नेण्यासाठी ८ मार्च २०२१ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनी वाराणसीच्या अस्सी घाटावर ११०० महिला व बालकांनी हातात प्रज्वलीत दीप धरून श्रीशिवतांडव स्तोत्र पठण केले. या कार्यक्रमाची जगभरात नोंद घेतली गेली. त्यानंतर देशभरातील महिलांच्या आग्रहास्तव प्रत्येक राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक पातळीवर स्तोत्र समापन सोहळा संपन्न झाला. विलेपार्ल्यात मुंबई विभागाच्या प्रमुख सौ. नंदिनीताई जोशी यांच्या पुढाकाराने रविवार दिनांक २१ ऑगस्ट २०२२ रोजी पार्लेश्वर मंदिरात स्तोत्र समापन सोहळा संपन्न झाला. यात चौसष्ठ महिला तसंच दोन चिमुरडे विद्यार्थी यांनी हातात प्रज्वलीत दीप धरून श्री शिवतांडव स्तोत्र पठण केले.



या कार्यक्रमास खासदार श्रीमती पूनमताई महाजन, आमदार श्री पराग अळवणी, डॉ. श्रीमती स्नेहलता देशमुख, नगरसेविका सौ. ज्योती पराग अळवणी, श्री. अभिजीत सामंत, डॉ. रश्मी फडणवीस, डॉ. नीला काळे, डॉ. मेधा लिमये, वीरमाता श्रीमती अनुराधा गोरे यांसह पार्ल्यातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

संस्थेतील सर्वात छोट्या विद्यार्थ्यांनी (दोघेही सहा वर्षे वयाचे) नंदिनी ताईंनी स्वत: विणलेले मोत्यांचे झेंडे देऊन मान्यवरांचे स्वागत केले. नंदिनीताईंनी संस्थेची ओळख करून दिली तसेच सामुदायिक उपासनेचे महत्व विशद केले. सौ. सायली फडके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

(ज्यांना स्तोत्र शिकायची इच्छा आहे त्यांनी सौ. नंदिनी जोशी यांच्याशी ९८२०१ ८०६८२ या नंबर वर संपर्क साधावा.)

# दयाळदास रोडचे श्री गणराज व त्यांचे बाळमित्र

'विलेपार्ल्याचा गणराज' ही सुंदर मूर्ती साकारणारे दयाळदास रोडचे श्री बाळमित्र मंडळ या वर्षी २५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. विठ्ठलवाडी - पाटीलवाडी ह्या वस्त्यांमधून या मंडळाचे खंदे कार्यकर्ते उभे राहिले आहेत.

प्लास्टर ऑफ पॅरिसचा त्याग करून पर्यावरण पूरक कागदी मूर्ती









स्थापन करण्याचा निश्चय मंडळाने केला आणि २०१३ पासून हा शिरस्ता अविरत चालू आहे.

माटुंग्याचे श्री. सागर चितळे हे सुप्रसिद्ध शिल्पकार दरवर्षी ह्या मूर्ती घडवितात. कागदाचा लगदा, केळीचे खांब, नारळाचा काशा, गोलाकार साकारण्याकरिता बांबूंच्या लवचिक पट्ट्या, फुलांपासून तयार केलेले नैसर्गिक रंग व या सर्वांना एकसंध ठेवण्याकरिता औदुंबरसारख्या झाडांचा चिकट अर्क असा सर्व नैसर्गिक थाट असतो.

श्रींच्या मंडपासमोर उभारलेले 'दानकक्ष' मंडळाच्या सामाजिक बांधिलकीचे द्योत आहे. 'उत्साह श्रमदानाचा, सामाजिक बांधिलकीचा' हे मंडळाचे ब्रीदवाक्य आहे. येथे जमा झालेल्या पुंजीतून कर्जत व पालघर येथील दहा - पंधरा दुर्गम आदिवासी पाड्यांमध्ये मंडळ कार्यरत आहे.

शैक्षणिक साहित्य, धान्य व खाद्यपदार्थ, रोजच्या वापराची प्रसाधने, संसारोपयोगी भांडीकुंडी इतकेच नव्हे तर शाळांमध्ये बाके, फळे व पंखे पुरविण्याचेही काम मंडळ करते.




कोविडच्या महासंग्रामात मंडळाने अनेक समाजोपयोगी कामे केली. या व्यतिरिक्त 'मोक्षरथ' ह्या मंडळाच्या उपक्रमाद्वारे अंत्ययात्रेसाठी विनामूल्य वाहन सेवा पुरवून स्वत: त्याचे सारथ्य करण्यात कार्यकर्ते अग्रेसर आहेत.

अनेक कार्यकर्ते आपल्या कोकणचा वारसा अभिमानाने सांगतात.

या मंडळाच्या मदतीच्या हातांना बळकटी द्यावी व कार्यकर्त्यांच्या पाठीशी सदैव उभे रहावे हीच श्री गणेश चरणी प्रार्थना !

